शासनाच्या मालकीचे सेसना सायटेशन ५६० एक्सएलस व्हीटी-व्हीडीडी या विमानाकरीता आधुनिक उपकरण खरेदीस मंजूरीबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्र.विचासं-१११८/प्र.क्र.२७/ २८-अ
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई ३२.
दिनांक: ९ फेब्रुवारी २०१८.

<u>वाचा</u> : उप संचालक, विमानचालन संचालनालय, जुहू विमानतळ, मुंबई यांचे पत्र क्र. डीए/ एडीएम/१२०/२०१८, दि.२९ जानेवारी २०१८ व ३/२/०१८ चे पत्र.

<u>प्रस्तावना :</u>

शासनाच्या मालकीच्या "सेसना सायटेशन ५६० एक्सएलस व्हीटी-व्हीडीडी" या विमानातील AMLCD हे उपकरण नादुरुस्त झाल्याने विमानचालन संचालनालयाने विहीत प्रक्रियेचा अवलंब करुन सेसना कंपनीचे अधिकृत विक्रेते एव्हीस व्हेंचर एल.एल.पी.मुंबई यांच्याकडून रु.९८,९७,५६६/- इतक्या किंमतीचे उपकरण खरेदी केले. सदर उपकरण त्वरेने विमानात बसविण्यात येऊन डी.जी.सी.ए.मार्फत "उड्डान योग्यता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यात आलेले आहे.

२. तथापि या प्रकरणी खर्चास मंजूरी बाबतचे प्राधिकार प्रशासकीय विभाग प्रमुख यांना असल्याने प्रशासकीय विभाग प्रमुखांची मान्यता घेण्यासाठी संदर्भाधीन पत्रान्वये संचालनालयाने प्रस्ताव सादर केलेला आहे.

शासन निर्णय :

प्रस्तावाच्या तपासणीनंतर शासनाच्या मालकीच्या **"सेसना सायटेशन ५६० एक्सएलस व्हीटी-व्हीडीडी"** या विमानात बसविण्यात आलेल्या AMLCD मल्टीफंक्शन इंडीकेटर हया उपकरणाच्या खरेदीस या शासन निर्णयान्वये मंजुरी देण्यात येत आहे.

२. संचालक, विमानचालन यांना हा खर्च करण्यास या द्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. या बाबतचा होणारा खर्च मागणी क्र.ए-४, "२०७०-इतर प्रशासकीय सेवा (११४) परिवहन साधनांची खरेदी व परिरक्षण (००) (०२) विमान चालन विषयक सल्लागार, महाराष्ट्र शासन २०७० ०१५६" या लेखाशिर्षातंर्गत "**५२ यत्रसामुग्री व साधनसामग्री"** या उद्दिष्टाखालील सबंधित आर्थिक वर्षात उपलब्ध अर्थसंकल्प तरतूदीतून भागविण्यात यावा, व त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

४. सदरहू आदेश उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या क्र.भाखंस-२०१४/प्र.क्र.८२ भाग III/उद्योग-४, दिनांक १/१२/२०१६ मधील “मुद्दा क्र.३.३ विशेष परिस्थितीतील खरेदी ३.३.१ तातडीची खरेदी” अन्वये प्रशासकीय विभाग प्राप्त प्राधिकाराअन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्र. २०१८०२१४१५०४२४५५०७ असा आहे. हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Sandhya Ashok Bageshwar

Digitally signed by Sandhya Ashok Bageshwar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=4d4a8d57e69da6499480bc974f18dca56ad5541c4795df9434c3e826318ec8ea, serialNumber=ba5a637883d7b445558182d1fd79c7e47a2d65e5094f71fb0ec8c5d23b0cc880, cn=Sandhya Ashok Bageshwar
Date: 2018.02.14 15:08:39 +05'30'

(सं.अ.बागेश्वर)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत ,

१. संचालक, विमानचालन संचालनालय, जुहू विमानतळ, मुंबई
२. महालेखापाल, (लेखा परीक्षा/ लेखा अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग (कार्या.२५), मंत्रालय, मुंबई
४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.